RNI Regd No. 1614/57 | REGD. No: MH/MR/SOUTH-143/2012-14

नवाकाळ

एकमेव स्वतंत्र दैनिक

संपादक- सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | एक चळवळ | वर्ष-९३, अंक-३००, पाने-१६, किंमत:₹४

web: http://navakal.org | मुंबई, रविवार ३ जानेवारी २०१६ | Email-navakal.1923@gmail.com

# मुलुंड येथे 'अटल वाचन कट्ट्या'चे उद्घाटन

■ मुंबई, प्रतिनिधी

''विविधांगी वाचन हे जीवनाला यथार्थता बहाल करीत असते. वाचनाच्या व्यासंगामुळेच व्यक्तिमत्व चतुरस्त्र होते. वाचनाची ही आवड जोपासण्यासाठी वाचन कट्ट्यांसारखे उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरतील'', असे उद्गार ज्येष्ठ वास्तुशास्त्रज्ञ दिलीप देशमुख यांनी येथे काढले.

'युगादेश' मासिकाच्या वतीने मुलुंड येथे 'अटल वाचन कट्ट्या'चे उद्घाटन करताना ते बोलत होते. 'आज तंत्रज्ञानाचा वापर करून आपली वाचनाची आवड जोपासता येते ती सवय तरुण पिढीमध्ये रुजवण्याकरिता या माध्यमाचा निश्चित उपयोग होऊ शकतो', असेही देशमुख यांनी यावेळी सांगितले. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने राज्यात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याचे आवाहन शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी सरकारच्या वतीने केले होते. प्रारंभी या 'अटल वाचन कट्ट्या'च्या उपक्रमाला विनोद तावडे यांनी दिलेला शुभेच्छा संदेश वाचून दाखवण्यात आला. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात राष्ट्रपती झालेल्या डॉ. ए. पी. जे. कलाम या दोन्ही महनीय व्यक्तींमध्ये वाचनाचा व्यासंग हा समान गुण असल्यामुळेच मुलुंड येथील या उपक्रमाला 'अटल वाचन कट्टा' संबोधले गेले आहे, अशी माहिती 'युगादेश' मासिकाचे संपादक लक्ष्मीकांत जोशी यांनी यावेळी दिली. तर दर महिन्याला चांगल्या पुस्तकातील उताऱ्यांचे वाचन तसेच पुस्तकांची देवाण घेवाण या कट्ट्याच्या माध्यमातून केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अटलबिहारी वाजपेयी यांनी नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयाच्या शतक महोत्सवी कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून केलेल्या भाषणाचे वाचन केले गेले. त्यामध्ये 'वाचन हे आनंदनिधानासारखे असते. त्यातून मनाचा उत्साह आणि आत्मविश्वास वाढीला लागतो', असा संदेश वाजपेयी यांनी दिला होता. तसेच वाजपेयींच्या 'अंधेरा छटेगा' तर डॉ. ए. पी. जे कलाम यांच्या एका कवितेचे यावेळी वाचन केले गेले.